MHBU130010962021

**नि.दि.दावा क्रमांक ७७/२०२१, आदेश निशाणी ३१ खाली.**
**(पारीत दिनांक २१/०७/२०२३)**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकतीच्या मोजणी करुन हद्द निश्चित करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीने कथन केले आहे की, सदरचा दावा त्याने त्याच्या मिळकतीच्या हद्दी निश्चित करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी मोजणी करण्यास नकार देत असल्याने शासकीय यंत्रणे मार्फत संयुक्त मोजणी करणे गरजेचे आहे. प्रतिवादीने सदर अर्जास म्हणणे दाखल करुन सदर अर्जास विरोध केलेला आहे. प्रतिवादीने कथन केलेले आहे की, वादीने दावा मिळकतीच्या चतुःसीमा चुकीच्या दर्शविलेल्या आहेत. वादीच्या ताब्यात दावा मिळकत नाही. करीता अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. युक्तीवाद ऐकला. दस्तऐवज पाहीले. वादीने मूळ दावा हा भूमि अभिलेख कार्यालया मार्फत दावा मिळकतीची मोजणी करुन हद्द कायम करण्याचा आदेश मिळण्याकरीता तसेच अतिक्रमीत जमीनीचा ताबा व मनाईचा आदेश मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीने दावा मिळकतीवर प्रतिवादी अतिक्रमण करत असल्याचे कथन केलेले आहे. सदरचा दावा हद्द निश्चित व अतिक्रमण काढुन घेण्याचा असल्याने अंतीम आदेश होण्यापुर्वी वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीची मोजणी होणे गरजेचे आहे. मोजणी न करता वादी व प्रतिवादी यांच्या मागणीप्रमाणे अंतीम निर्णय होवु शकत नाही अथवा झाल्यास त्याची अंमलबजावणी करणे अशक्य आहे. वादी व प्रतिवादी यांचया मिळकतीची मोजणी झाल्यास वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद कायम स्वरुपी मिटण्यास मदत होणार आहे. करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अधिक्षक भूमि अभिलेख, चिखली यांनी मौजे गोद्री येथील गट नंबर ३३१ मधील वादी व प्रतिवादी यांची संयुक्त मोजणी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करावा. मोजणी मध्ये कोणाच्या ताब्यात किती क्षेत्र आहे याचा स्पष्ट खुलासा करावा. आवश्यकता भासल्यास गट नंबर ३३१ लगत असलेल्या मिळकतीचे देखील मोजमाप करुन गट नंबर ३३१ चे क्षेत्र व ताबा स्पष्ट होईल अशा प्रकारे अहवाल सादर करावा.

३. मोजणीचा खर्च वादीने पुढील तारखेपर्यंत भरुन न्यायालयात पावती दाखल करावी.

Digitally signed by DESHINGE HARIBHAU D
Date: 2023.07.21 16:14:57 +0530

दिनांक २१/७/२०२३ (एच.डी.देशिंगे)

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चिखली.

Certificate

I B.B.Theng, Stenographer to J.M.F.C. Chikhli affirm that, the content of this PDF judgment file is the same as per the original judgment.